c/183

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सिडको महामंडळाकडील लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी अधिसुचित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सिआयडी-३३२२/१२५२/प्र.क्र.१५४/नवि-१०**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ३ नोव्हेंबर,२०२२

**वाचा** : १. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
२. शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१५/प्र.क्र.१८८/१५/नवि-१३, दि.१८.१२.२०१८

**प्रस्तावना :-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा दि.२८.०४.२०१५ रोजी महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सिडको महामंडळाकडील लोकसेवांसाठी नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपील अधिकारी अधिसुचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम-३ नुसार सिडको महामंडळाकडील अनुसूची -अ॰ मधील सेवा या आदेशान्वये अधिसुचित करण्यात येत आहेत. नगर विकास विभागाअंतर्गत सिडको महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या लोकसेवांसाठी लोकसेवेचा कालावधी, सेवा अधिसूचीत करणारे कार्यालय तसेच पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, व्दितीय अपिलीय अधिकारी याबाबतचा तपशिल अनुसूची -अ॰ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

२) अनुसूची -अ॰ मध्ये नमुद सेवा देण्यास जबाबदार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांनी नागरिकांना विहीत मुदतीत सेवा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी.

c/185

३) अनुसूची -अ॰ मध्ये नमुद सेवांच्या तपशिल सिडको महामंडळाच्या प्रत्येक कार्यालयाच्या फलकावर सुवाच्य अक्षरात ठळकपणे प्रदर्शित करावा.

४) अनुसूची -अ॰ मध्ये नमुद सेवा "आपले सरकार" च्या वेबपोर्टलवरील Dashboard of Right to service वर "महाआयटी" च्या मदतीने उपलब्ध करून देण्यात याव्यात.

५) "महाआयटी" ही मार्फत सिडको महामंडळाकडील संबंधीत पदनिर्देशीत अधिकाऱ्यांना "युजरआयडी" व "पासवर्ड" उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच सदर सेवा " आपली सरकार" पोर्टल वरून उपलब्ध करून देणेसाठी तांत्रिक सहाय्य करण्याची जबाबदारी "महाआयटी" यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२११०३१११४५२२६२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सोबत : अनुसूची-अ**

SHINDE SUBRAO NARAYAN

Digitally signed by SHINDE SUBRAO NARAYAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GOVERNMENT OF MAHARASHTRA, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E5BB5862D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B0FB615DC6CCE4812BDED257, cn=SHINDE SUBRAO NARAYAN
Date: 2022.11.04 15:47:38 +05'30'

**(सु.ना.शिंदे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (प्र.सु.व र.का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, मंत्रालय, मुंबई
९. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको,मुंबई.
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, मुंबई / नागपुर
११. महालेखापाल, (लेखापरिक्षा)-१/२, मुंबई/ नागपुर
१२. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. उप सचिव (लो.दि.कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. अवर सचिव (नवि-१३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती (नवि-१०).